नागपूर महानगरपालिकेच्या दि.20.07.2017 गुरूवार रोजी दुपारी 12.10 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मंथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 8. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 9. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 10. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 11. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 12. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 13. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 14. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 15. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 16. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 17. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 18. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 19. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 20. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 21. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 22. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 23. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 24. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 25. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 26. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 27. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 28. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 29. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 30. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 31. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 32. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 33. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 34. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 35. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 36. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 37. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 38. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 39. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 40. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 41. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 42. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 43. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 44. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 45. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 46. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 47. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 48. | 14 | अ | शिल्पा ईशांत धोटे | सदस्या |
| 49. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 50. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 51. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 52. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 53. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 54. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 55. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 56. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 57. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 58. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 59. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 60. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 61. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 62. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 63. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 64. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 65. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 66. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 67. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 68. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 69. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 70. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 71. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 72. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 74. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 75. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 76. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 77. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 78. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 79. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 80. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 81. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 82. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 83. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 84. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 85. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 86. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 87. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 88. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 89. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 90. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 91. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 92. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 93. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 94. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 95. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 96. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 97. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 98. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 99. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 100. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 101. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 102. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 103. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 104. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 105. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 106. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 107. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 108. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य |
| 109. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 110. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 111. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 112. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 113. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 114. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 115. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 116. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 117. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 118. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 119. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 120. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 121. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 122. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 123. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 124. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| **125.** | **35** | **अ** | **————(रिक्त १०.४.२०१७ पासून)** | **रिक्त पद** |
| 126. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 127. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 128. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 129. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 130. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 131. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 132. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 133. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 134. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 135. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 136. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 137. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 138. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 139. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 140. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| 141. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 142. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 143. | मानद सदस्य | | रिक्त | |

**<u>अनुपस्थित सदस्य</u>**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 2. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 3. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 5. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 6. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 7. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 8. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 9. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 10. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 11. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 12. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 13. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

श्री.अश्वीन मुदगल, निगम आयुक्त
श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः– सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

**ठराव क्रमांक 61** :– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**मा.देवेंद्र फडणवीस**

राज्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना 34 हजार कोटी रूपयांचे कर्ज माफ करून शेतकऱ्यांची मोडकळीस आलेली आर्थिक घडी सुधारण्याचा देशाच्या ईतिहासातील सर्वात मोठा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री ना.श्री.देवेन्द्र फडणवीस यांनी घेतल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याकरीता ऊर्जामंत्री चंद्रशेखर बानवकुळे यांनी पुढाकार घेऊन कोराडी वीज केंद्रालगतच्या सहा गावांमध्ये महानिर्मितीच्या सांघिक सामाजिक जवाबदारी अंतर्गत 'ई–पाणपोई (पाणी एटीएम) चा प्रकल्प उभारला. ग्रामीण भागातील नागरिकांना माफक दरात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल या उपक्रमाला जलव्यस्थापनाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>सुरेश व्दादशीवार</u>**

प्रतिष्ठीत अरविंदबाबू देशमुख पत्रकारिता पुरस्कार–2017 यात दैनिक लोकमतच्या नागपूर आवृत्तीचे संपादक सुरेश व्दादशीवार यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>मामासाहेब घुमरे</u>**

ग्रंथालयाच्या विकासासाठी 'ग्रंथालय भारती' या संस्थेच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा पहिला 'महर्षी व्यास पुरस्कार' दैनिक तरूण भारतचे माजी मुख्य संपादक दि.भा.उपाख्य मामासाहेब घुमरे यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>हरेश व्होरा</u>**

नागपूर जिल्हा फुटबॉल संघटनेच्या (नागपूर जिल्हा फुटबॉल असोसिएशन) अध्यक्षपदी हरेश व्होरा यांची दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>दिव्या देशमुख / संकल्प गुप्ता</u>**

दिल्ली येथील कॉमनवेल्थ बुद्धीबळ स्पर्धेत नागपूरच्या 12 वर्षाखालील मुलीच्या गटात वुमन फिडे मास्टर दिव्या देशमुख यांना अजिंक्यपद तर 14 वर्षाखालील खुल्या गटात नागपूरच्या संकल्प गुप्ताने उपविजेपद पटकावित चमकदार कामगिरी बजावल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा दोघांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. अमित समर्थ</u>**

दिग्गज सायकलिस्टला खुणावणाऱ्या परंतु सायकलपटूंचे लक्ष्य असलेल्या 'रेस अक्रॉस अमेरिका' (रॅम) पहिल्याच प्रयत्नात पूर्ण करीत देशातील पहिले सायकलपटू होण्याचा 'आयर्न मॅन' डॉ. अमित समर्थ यांनी विक्रमी नोंद करून नागपूर नगरीचे नांव लौकीक केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर :– सन्माननिय सदस्यगण प्रश्नोत्तराच्या तासाला सुरु करीत आहे.
श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेची शाळा 17 जुन 2017 पासुन सुरु झाली. ....
महापौर :– मा.सदस्यगण प्रश्नोत्तराच्या तासानंतर यावर चर्चा करावी.
**<u>प्रश्न क्र 18</u>**:– डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना तसेच सफाई कामगारांना या योजने अंतर्गत घरे देण्यात आली आहेत. त्या संदर्भात प्रश्न.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौरजी, जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे लेखी स्वरुपात प्रशासनाकडुन उत्तर मिळाले त्यावर आक्षेप असा आहे की 2008 साली स्व.माजी मा.मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख साहेब यांनी 2008 साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना अमलात आणली होती त्यावर शासन निर्णय झाला होता त्यावर निर्णय झाल्यानंतर आज 9 ते 10 वर्षाचा काळ होवुन गेला आहे. या काळामध्ये आज महानगरपालिकेमध्ये बी.जी.पी. पार्टीची सत्ता प्रस्तावित झाली आहे त्यानंतरही येथे 25

वर्ष पुर्ण झालेले जे सफाई कर्मचारी येथे राहतात त्यांच्याकरिता 269 स्केअर फुटचे आवास आपण त्यांना तयार करुन देण्याची तरतुद आहे. महानगरपालिका महाराष्ट्र शासनापेक्षा वरचढ झाली आहे काय ? शासनाचा निर्णय 2008 पासुन आहे तरी आतापर्यंत त्या निर्णयाची अंमलबजावणी महानगरपालिकेनी केलेली नाही यामध्ये काहीही तरतुद झालेली नाही या वर्षीच्या सहाव्या महिन्यामध्ये 2017 मध्ये बजेटमध्ये 40 कोटीची तरतुद केली पाहिजे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, बंटी शेळकेजींचा जो प्रश्न आहे कारण नागपूर शहरामध्ये झोपडपट्टयामध्ये गरीब ऐरियामध्ये जे लोक राहतात त्या भागामध्ये त्यांना पुर्वी आंबेडकर रमाई योजनेअंतर्गत घर देण्याचा सर्व सामान्य लोकांना 1 हेड होता त्यामध्ये नंतर बदल झाला फक्त काही विशिष्ट लोकांनाचा ते घर देता येईल त्याच्या जवळ बी.पी.एल. चे कार्ड असले पाहिजे त्याचे बि.पी.एल. च्या यादीमध्ये नाव असले पाहिजे महानगरपालिकेच्या लिस्टमध्ये त्याच्यामध्ये आपण सुधारणा करण्यात यावी, पुर्वी आंबेडकर रमाई योजनेमध्ये जे गरीबांचे पडलेले घरे होती त्या पडलेल्या घरांची आजही हालत इतकी खराब आहे की त्या घरात सतत पाणी गळते स्लम मध्ये जर आपण त्याचा सर्व्हे केला तर या योजनेचा लाभ सर्व सामान्य झोपडपट्टीवाल्यांना दिला पाहिजे.

श्री.बंटी शेळके :— मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावानी ही योजना राहिल्यानंतर ती योजना आपण लोकांपर्यत पोहचवु शकलो नाही, टॅक्स भरला नाही तर त्याचा दुकानासमोर किंवा त्याच्या घरासमोर दवंडी पिटवितो त्याच्याबद्ल जिव्हाळा महानगरपालिकेला वाटत नाही हा 2008 चा जी.आर. आहे आणि उत्तर दिले आहे एकही घर आपण बांधलेले नाही मा.महापौरजी यामध्ये जे उत्तर दिले आहे त्यामध्ये आपणही आक्षेप नोंदविला पाहिजे कारण 2008 ची योजना आहे आणि एकही घर उपलब्ध करुन दिलेले नाही.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी श्रम साफल्य योजनेमध्ये ज्या सफाई कर्मचा—यांचे 25 वर्ष पुर्ण झालेले आहे अशा सफाई कर्मचा—यांची यादी महानगरपालिकेने तयार केलेली आहे काय? हा माझा प्रश्न आहे.

महापौर :— प्रशासनाने उत्तर दयावे.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :— मा.महापौरजी, या संदर्भात आपण जिल्हाधिका—यांना पत्र दिले आहे जागा मागणी करीता.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, माझा प्रश्न असा की ज्या सफाई कर्मचा—यांची 25 वर्ष सेवा पुर्ण झाली आहे अशा सफाई कर्मचा—यांची यादी प्रशासनाकडे उपलब्ध आहे काय ?

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार):— मा.महापौरजी, विभागाकडुन यादी तयार करण्यात आलेली आहे 2008 ते 2015 पर्यत 992 लोकांची यादी तयार करण्यात आलेली आहे या संदर्भात आपण म्हाडाला पत्र आणि यादी पाठविण्याचा प्रस्ताव तयार करीत आहे.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, 992 लोकांची जर यादी तयार झाली असेल तर त्या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्याच जागेवर आपल्याला आवास योजना करता येते, म्हाडाच्या माध्यमातुन जर जागा मिळत असेल तर निश्चितपणाने चांगली गोष्ट आहे मात्र महानगरपालिकेने स्वतःच्या मालकीच्या जागा मोठ मोठया संस्थांना लिजवर देवुन राहिलो आणि सफाई कर्मचा—यांसाठी आपण म्हाडाकडे अर्ज करुन राहिलो. मा.महापौरजी मला असे वाटते की महानगरपलिकेच्या ज्या उपलब्ध जागा आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना आहे ही मुळात काय योजना आहे कोणासाठी आहे, त्यामध्ये निधी कोण देणार आहे, महानगरपालिका देणार आहे, राज्य शासन देणार आहे की, केंद्र शासन देणार आहे, जमिन कोण देणार आहे ही संपुर्ण माहिती दयावी म्हणजे सर्व क्लीअर होवुन जाईल मग आपण पुढील प्रश्नांचे उत्तर दिले पाहिजे.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार):— मा.महापौरजी, 22 ऑक्टोबर 2008 चा जी.आर आहे. सफाई कर्मचारी आपले आरोग्य धोक्यात घालुन सेवा करीत आहे हे त्यांचे विशिष्ट स्वरुपाचे काम व त्याचा सामाजिक व आर्थिक दर्जा विचारात घेवुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्यातील नगरपालिका,

महानगरपालिका, सफाई कर्मचा–यांची सदनिका देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत शासनाने सर्वकश विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला. राज्यातील नगरपालिका महानगरपालिकातील सफाई कामगारांचे काम लक्षात घेवुन ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्ष किंवा त्याहुन अधिक झालेली आहे अशा सफाई कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यांत येणार आहे. अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास महानगरपालिका नगरपालिके व्दारा सदनिका देण्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी या योजनेमध्ये जमिन कोण देणार आहे, पैसे कोण देणार आहे महानगरपालिकेच्या बजेट मधुन दयायचे आहे की शासन देणार आहे की केंद्र शासन देणार आहे पैसे आणायचे कुठुन हे विचारत आहे.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, सफाई कर्मचारी निवृत्त झाल्यावर आर्थिक दृष्टया अल्प गटात मोडत असलेल्या बी.एस.यु.पी. व आय.एच.एच.सी या दोन्ही योजनेमध्ये बांधलेल्या सदनिका पैकी 15 टक्के सदनिकाचे वाटप प्रत्येक योजनेअंतर्गत सेवानिवृत्त सफाई कामगारांना देण्याचे प्रावधान आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, बी.एस.यु.पी. योजनेमध्ये 4500 घरे बांधले आहे त्यामध्ये 15 टक्के आरक्षित करा असे शासनाने म्हटले आहे तर आपण आरक्षित केले आहे काय ?

महापौर :– प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता(स्लम) (जांभुळकर) :– मा.महापौरजी, ती यादी तयार करण्यात आली आहे मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर 15 टक्के आरक्षित केल्यानंतर पुढे ते करता येईल.

श्री. प्रविण दटके :– मा.महापौरजी, आपण त्या सदनिकेचे वाटप केले आहे अशी माझी माहिती आहे, हे खरे आहे काय?

कार्यकारी अभियंता(स्लम) (जांभुळकर) :– मा.महापौरजी, बी.एस.यु.पी. मध्ये ऑलरेडी 4201 घरकुल आहे त्यामध्ये जवळपास 3900 कंम्पलीट झाले आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी मग हा जी.आर. चुकीचा आहे काय ?

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, बी.एस.यु.पी योजने अंतर्गत 15 टक्के आपण आरक्षित यासाठी केले नाही कारण महानगरपालिकेने त्या पात्र सफाई कर्मचा–यांची यादीच तयार केली नाही त्या संदर्भातील हा प्रश्न आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, प्रशासनाने सांगितले पाहिजे की यादी होती की नव्हती ? आणि यादी तयार करण्याचे काम कोणाचे आहे, हेल्थ ऑफीसरचे आहे की बि.एस.यु.पी. चे आहे की एस.आर.ए. सि.ई.ओ. चे आहे शासनाकडुन जो कार्यकारी अभियंता येतो त्याचे आहे याची पण माहिती प्रशासनाने दयावी.

श्री. प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, हा जी.आर. 2007 ला आला आणि आपण यादी केव्हा तयार केली. कुठल्या तारखेला ही यादी तयार केली आहे ती माहिती प्रशासनाने दयावी.

श्री.सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, यादी तयार हुई या नही हुई यह अलग विषय है जब सदनिका की संख्या निश्चित थी उसमे 15 परसेंट आरक्षित करना था। जब यादी बनेगी तो जो लाभार्थी रहेंगा उसको मिलेंगा इसका कोई संबंध नही है की उस वक्त लिस्ट बनी थी की नही बनी थी।

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, यादी तयार करण्यास जो विलंब झाला तो मला सभागृहाच्या निर्देशनास आणुन दयायचा आहे.

श्री.प्रविण दटके :– उत्तर आले पाहिजे की यादी केव्हा तयार झाली यादी होईल न होईल पण आरक्षित तर पहले जागा करायची होती कारण 2007 ला जी.आर.आला 2007 पासुन आज 2017 आहे. जी.आर. मध्ये सांगितले आहे शासनानी की बी.एस.यु.पी. असेल किंवा राजीव गांधी आवास योजना असेल त्यामध्ये 15 टक्के तुम्हाला आरक्षित करायचा आहे. मग आरक्षित जागा ठेवायला पाहिजे होती. यादी तर निश्चितपणे त्याच वेळेस तयार व्हायला पाहिजे होती. यादी केव्हा झाली याचे उत्तर प्रशासनाने दयायला पाहिजे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाल्मीकी आवास योजनेचे नारी.....

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, माझया जवळ संख्या आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी संख्या नाही यादी केव्हा तयार झाली ते सांगा.

वैद्यकीय अधिकारी (एस)(श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, यादी 2015 मध्ये झालेली आहे.

श्री प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, पहिल्यांदा हा प्रश्न या सभागृहामध्ये आला असे नाही या आधी ही हा प्रश्न या सभागृहात उपस्थित करण्यांत आला होता त्यावेळेस महानगरपालिकेमध्ये यादी उपलब्ध नाही, यादी तयार करण्याचे काम सुरू आहे, हे उत्तर दिल्या गेले होते. अश्यापध्दतीची यादी तयार झालेली नाही,आता हे 2015 मध्ये यादी तयार करण्यात आलेली होती असे सांगत आहे यांनी पुर्ण जबाबदारीने उत्तर द्यावयास पाहिजे कारण त्यांनी त्यावेळी सांगीतले होते कि यादी तयार झालेली नाही, त्याचे नांव शोधणे सुरू आहे, आपण पात्र उमेदवारांची यादी कोणत्या तारखेला तयार केली, त्याची माहिती जबाबदारीने याठिकाणी द्यावी.

वैद्यकीय अधिकारी (एस)(श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, तारीख माहित नाही, संख्या आहे.

श्री प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, यादी तयार केली कि नाही, विभागात पात्र उमेदवारांची यादी आहे काय ? यादी आपण प्रसिध्द केली काय ? मग त्यांना कसे माहित होईल कि आपल्याला या योजने अंतर्गत घर मिळणार आहे.

श्री प्रविण दटके :– मा.महापौरजी, या विषयावर निगम आयुक्तांनी निवेदन करावे, जेणेकरून निट आदेश जातील, त्याचे स्पष्टीकरण निट होईल व सर्व समस्या संपुन जाईल ज्या आपल्या कर्मचा–यांनी नागपूर शहराची स्वच्छता सगळे त्यांनी सांभाळले त्यांच्यासाठी जी योजना सरकारनी आणली आहे, ती निट प्रभावी पध्दतीने राबविली पाहिजे, असे आपण आदेश द्यावे. मा.आयुक्तांचा याच्यावर स्पष्टीकरण घ्यावा.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाल्मीकी आवास योजने अंतर्गत मागील जी कोणती सरकार असेल त्यांनी 1292 क्वार्टर बनुन तयार आहे, तेथे समाजकंटक असतील ते विक्री करून राहिले, फक्त त्यापैकी 111 सदनिकाचे वाटप झालेले आहे. पाण्याची सोय आहे, त्याठिकाणी लाईटची सोय आहे, रस्त्यांची सोय आहे, कंपाउंड वॉल सुध्दा तयार आहे. अश्या लोकांना खरोखरच वाटण्याची इच्छा असेल तर आपण तसे आदेश द्यावे, मागच्या अनेक वर्षापासून पी.एम. पासून तर सी.एम. पर्यंत आमदारांपासून तर सभागृहापर्यंत मोर्चे घेवून आलो, पत्रव्यवहार केला इच्छाशक्ती असावयास पाहिजे, खरोखरच जे श्रम करणारे आपले सफाई कामगार आहे जे अस्थायी बेसीसवर काम करून राहिले आहे अश्या लोकांना आपण घर गिफ्ट म्हणुन दिले तर काही फरक पडणार नाही. एक तर आपण त्यांना स्थायी करून राहिले नाही येवढी मोठी आपण गिफ्ट आपल्याकडुन दिली त्यांना तर चांगले काम होईल. हे तुमच्या रेझीममध्ये चांगला काम होईल, जितके भगवान असतील त्यांचा तुम्हाला आशिर्वाद भेटेल.

महापौर :– आयुक्त साहेबांनी स्पष्टीकरण द्यावे.

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना त्याचा जी.आर. 22 ऑक्टोबर 2008 चा आहे. त्याच्यामध्ये जे सफाई कर्मचारी त्यांची सेवा 25 वर्ष किंवा त्याच्यापेक्षा जास्त झाली असेल किंवा सेवा कालावधीमध्ये ते मृत्यु पावले असेल अश्या लोकांना बी.एस.यु.पी. अंतर्गत 15 टक्के लाभ देण्याची तरतुद आहे. या अनुषंगाने जी कार्यवाही करावयाची आहे ती दोन एजंसीला करावयाची आहे एक महानगरपालिकेला करावयाची आहे आणि एक नोडल एजंसी व दुसरी म्हाडाला करावयाची आहे. या अनुषंगाने सभागृहामध्ये जी माहिती देण्यांत आली त्यात असे सांगण्यात आले कि 2015 मध्ये यादी तयार करण्यांत आलेली आहे 942 लोकांची त्या अनुषंगाने ती यादी केव्हा तयार करण्यांत आली तसेच जे अनुषंगिक मुद्दे आहे त्याच्याबाबतीत आम्ही तपासणी करून त्याचप्रमाणे या योजनेची जी यादी आहे ती मुळातच पहले आपल्याला जी एजंसी म्हाडाची आहे त्यांच्याकडे पाठविणे त्यांची मान्यता घेणे अभिप्रेत आहे, जी.आर.प्रमाणे कदाचित ती कार्यवाही झालेली नाही. ती कार्यवाही आम्ही पुढच्या कालावधीमध्ये करणार आहे.

श्री प्रविण दटके :– मा.महापौरजी, आपण आपल्या रुलिंग मध्ये निश्चित कालावधी ठरवुन दयावा.

महापौर :– या दोन्ही योजनेच्या संदर्भात मा.सदस्यांनी मांडलेली मते व त्यावर प्रशासनाने मांडलेली भुमिका लक्षात घेवून शासनाच्या जी.आर.प्रमाणे प्रशासनाने प्रभावी पणे ही योजना राबवावी. त्याची माहिती एक महिन्याच्या आंत सादर करण्यात यावी.

श्री.जगदीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, यह योजना जाटतरोडी और टाकळी मे भी की गयी थी और वहां पर कुछ बस्तीयॉ डिसाईड करके जिनके बारे मे शासन का धोरण है कि स्लम बस्तीयो को झोपडपटटी मुक्त करना यह शासन का धोरण है। और यही धोरण नागपूर महानगरपालिका का भी रहा है और उसमे अचानक इस योजना के अंतर्गत दुसरी बस्तीयॉ नही ली गयी। जिनके कच्चे मकान है उनको पक्के मकान बनाकर देना ऐसा शासन का धोरण था। मैं हाउस से पुछना चाहता हुॅ कि पिछले तीन चार साल से उस धोरण को क्यों रोका गया। क्यों कच्चे मकान पक्के नही किये गये।

**<u>प्रश्न क्र.19</u>** :– ओ.सी.डब्ल्यु कंपनीने नागपूर महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रातील प्रत्येक प्रभागातील वसाहतीना 24 तास पाण्याचे वितरण संदर्भात प्रश्न.

श्री रमेश पुणेकर :–मा.महापौरजी, मेरा प्रश्न यह था कि प्रभाग 20 मे तांडापेठ, ठक्करग्राम, विणकर कॉलनी और इस परिसर मे एक दिन के आड एक घंटा पानी दे रहे है। उसमे भी एक घंटे के पानी मे आधा घंटा पानी गंदा आरहा है। ऐसी सूरत मे लोग खाना बनायेगें, अपनो बच्चो को स्कुल भेजेगें और नहायेगें कब, आप मुझे इस बात का उत्तर दिजीये कि आप आधा घंटा पानी आयेगा तो क्या करेगे।

महापौर :– मा.सदस्यगण, आपल्याला लिखितस्वरूपात उत्तर दिलेले आहे, त्याबाबतीत आपल्याला प्रश्न विचारावयाचे आहेत काय ?

श्री रमेश पुणेकर :– मा.महापौरजी, ओ.सी.डब्लु. 1.4.2012 ला आलेली आहे त्या आधी नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारीत हे काम सुरू होते. या समस्येकडे नागपूर महानगरपालिकेच्या अधिका–यांनी, नगरसेवकांनी लक्ष दिले कि नाही हे मला माहित नाही. मी जो प्रश्न दिला तो आज आलेला आहे त्या परिसरामध्ये आज ही एक दिवसाआंड पाणी येत आहे तो ही अर्धा तास गंदा पाणी येते, त्यामुळे लोकांचे आरोग्य खराब होत आहे. आम्हाला समप्रमाणात पाणी मिळेल काय ? हमारे प्रभाग मे पानी नही मिलरहा है इस बात पर कौन जवाब देंगा. मैंने इस संदर्भ मे आपको फोन किया लेकिन आपने फोन नही उठाया। प्रशासन ओ.सी.डब्लु.वाले फोन नही उठाते ऐसी सूरत मे हमने कहां जाना चाहिये। हमारे प्रभाग की जनता को पानी मिलेगा या नही. हम लोगो ने कैसे जीना मा.उपमहापौर साहब और मेरा प्रभाग एक ही है। जब वह लोग उपमहापौरजी की नही सुन रहे है तो हमारी क्या सुनेगें। एखाद्या नगरसेवक जब आपको फोन करता है कोई परिस्थिती ऐसी उत्पन्न होजाये तो आपने फोन उठाना चाहिये, लेकिन आपने भी फोन नही उठाया। जनता आये दिन हमारे घर मे मोर्चा लेकर आती है, हमने उनको क्या जवाब देना चाहिये। हमको जनता के बिच मे जाना पडता है हमको पानी मिलेगा या नही मिलेगा इस बात की जानकारी दी जाये।

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री गायकवाड :– मा.महापौर महोदया, त्यांनी ज्या वस्त्यांचे नांव दिलेले आहे. ती माहिती मी दिली आहे याशिवाय त्यांनी वेगळी माहिती विचारली असती तर मी ती माहिती त्यांना दिली असती.

श्री रमेश पुणेकर :– मा.महापौरजी, आपण किती वेळेस तेथे पाणी देता हे माझ्यासोबत येवून पहा. मा. आयुक्त साहेब, मा.महापौरजी आपण हाउस संपल्यानंतर माझ्यासोबत चाला काय परिस्थिती आहे मी आपल्याला दाखवितो. प्रशासन अश्याप्रकारे चुकिचे उत्तर देवुन हाउसला गुमराह करीत आहे. आम्ही यांना काही माहिती मागितली तर हे इंग्लिशमध्ये माहिती देतात आम्ही इतके शिकलेलो नाही, यांनी मराठीत माहिती द्यावयास पाहिजे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– कन्हान जलवाहिनीवरून उत्तर नागपूरच्या अनेक वस्त्यामध्ये पाणी पम्पींग होते, प्रश्न असा आहे कि सगळीकडे बाकीच्या क्षेत्रामध्ये शहरात पाणी पुरवठा नियमित सुरू आहे. परंतु कन्हानवरून जी जलवाहिनी येते तेथील ओपन लाईन आहे त्यामुळे उन, वारा, पावसात झाडे पडली तर तेथील बिजली जाते त्यामुळे उत्तर नागपूर या क्षेत्रामध्ये नियमित पाणी पुरवठा होत नाही.

महापौर :– कार्यकारी अभियंता यांनी मा.सदस्य श्री.पुणेकर यांच्या सोबत त्यांच्या भागात दौरा करावा व त्यांची समस्या सोडवावी.

श्री रमेश पुणेकर :– मा.महापौरजी, पिछले महिने हाउस के लिये प्रश्न दिया था वह अभी आया। हमारे प्रभाग मे सिर्फ आधा घंटा पानी चालु है। मा.आयुक्त साहब आप जवाब दिजीये।

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला होता आपल्या प्रभाग 20 मध्ये बारसेनगर, शोभापेठ, ठक्करग्राम, चंद्रभागानगर, दारव्हेकरनगर, विणकर कॉलनी, नवशक्ती विद्यालय, याच्यामध्ये पाण्याच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण प्रश्न विचारला होता, या विषयाच्या बाबतीत आपण म्हणाले कि माझा फोन कोणी उचलला नाही माझी याबाबतीत आपणांशी दोन तीनदा चर्चा झालेली आहे. व आपण म्हणत आहे कि माझा फोन कोणी उचलला नाही. मागच्या सभेत हा प्रश्न विचारण्यांत आला त्या अनुषंगाने लिखितस्वरूपात प्रशासनामार्फत उत्तर देण्यांत आला होता. आता हा प्रश्न तोंडी स्वरूपात विचारण्यांत आलेला आहे, याच्यात देखील उत्तर देण्यांत आलेला आहे. या उत्तरावर जर आपले समाधान होत नसेल तर कार्यकारी अभियंता आपल्याबरोबर आपल्या प्रभागाचा दौरा करतील. ते आपले म्हणणे ऐकुण घेतील, व समस्यांचा तोडगा काढतील.

**<u>प्रश्न क. 20</u>** :— नागपूर शहरात दुषित पाणी पुरवठा संदर्भात प्रश्न.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, नागपूर शहरात मोठयाप्रमाणात दूषित पाण्याची तक्रारी मा.सदस्यांच्या मार्फत आपण कळवितो. वर्तमानपत्रात सुध्दा मोठयाप्रमाणात हे छापुन येतात. आणि मी विचारलेल्या प्रश्नामध्ये 2012 पासून साधारणतः 7500 तक्रारी दूषित पाण्याच्या संदर्भात महानगरपालिकेला प्राप्त झाल्या, असे उत्तर मला देण्यांत आलेले आहे. हया तक्रारी नोंद करण्याची व्यवस्था महानगरपालिकेच्या कुठल्या विभागांतर्गत केल्या जाते आणि कशाच्या माध्यमातुन केल्या जाते याचे उत्तर प्रशासनानी मला द्यावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :— मा.महापौरजी, दूषित पाण्याची तक्रार आली तर आम्ही तेथील सॅम्पल कलेक्ट करतो.

श्री प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, तक्रारी कुठल्या माध्यमातुन येतात, मोबाईलवर येतात कि कम्प्युटरवर येतात, कश्या माध्यमातुन येतात, आणि आम्ही जी ओरल तक्रार करतो त्यांची नोंद कोण करतो.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, मा.सदस्यांनी कुठे ही तक्रार केली तर ओ.सी.डब्लु. च्या सॉफ्टवेअरमध्ये ती नोंद होते.

श्री प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, आता विभागाकडुन सांगण्यात आले आहे कि ओ.सी.डब्लु. च्या साफ्टवेअरमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारीची नोंद होते, ज्या तक्रारी नागरिक टेलिफोनवर करतात त्याची नोंद कुठे होते. तसेच नगरसेवकांच्या माध्यमातुन ज्या तक्रारी केल्या जातात मागच्यावेळेस मा.सदस्य श्री भुटटो साहेब आम्ही यांच्या प्रभागातील दूषित पाण्याच्या संदर्भात मा.आयुक्त साहेबांकडे गेलो आणि तक्रार देण्यांत आली होती, त्याची नोंद विभागाकडे आहेत काय ? त्याठिकाणी मोठया प्रमाणात दूषित पाण्याची समस्या आहे. त्याचबरोबर आमच्या मनोजभाऊ गावंडेच्या एरीयामध्ये मोठया प्रमाणात दूषित पाण्याची तक्रार आहे. आणि मागच्या चार महिन्यापासून मी सदस्यांच्या दूषित पाण्याच्या संदर्भात ऐकुन राहिलो आहे मात्र त्यावर आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा तोडगा निघालेला नाही.आणि अश्या तक्रारींची नोंद सुध्दा होत नाही, उदाहरणार्थ मी दोन तक्रारी आपल्याला सांगीतल्या आहेत मागच्या चार महिन्यापासून मा.सदस्यांच्या मार्फत सातत्याने ओरड होवून राहिली आहे परंतु त्याची दखल घेतल्या जात नाही. उत्तर नागपूरात असेल, मध्य नागपूरात असेल मोठया प्रमाणात दूषित पाण्याच्या तक्रारी आहे. यावर एवढा सुंदर कंप्लायन्स आहे की आता कुठलिही तक्रार शिल्लक नाही केवळ 72 तक्रारी विविध कारणामुळे प्रलंबित आहे अश्यापध्दतीचा प्रशासनाकडुन मला उत्तर देण्यांत आलेला आहे. ही वास्तविकता आहे काय ? आज दूषित पाणी मोठया प्रमाणात अनेक वस्त्यामध्ये जात आहे आणि आपण शुध्द पाण्याचे बील घेतो व दूषित पाण्याची तक्रार चार चार महिन्यापासून प्रलंबित असतील तर त्यांचे आपण चार महिन्याचे बील माफ करणार आहे काय ? हा माझा प्रश्न आहे कारण आपण येथे जे टॅरीफ आकारून राहिलो आहे ते शुध्द पाण्याचे आहे. दूषित पाणी जर या जलवाहिनीच्या माध्यमातुन नागरिकांना जात असेल तर मला असे वाटते कि त्यांचा पाण्याचा बील आपण रद्द केला पाहिजे.एकीकडे आपण व्याज सुध्दा लावुन राहिलो जर कोणी विलंबाने पैसे भरत असेल तर त्यांच्यावर आपण व्याज लावतो. आता या ठिकाणी भुटटो साहेबांच्या वार्डामध्ये मोठया प्रमाणात दूषित पाण्याच्या तक्रारी प्राप्त होत आहे, त्या भागातील समस्या आतापर्यंत सोडविण्यात आलेली नाही, त्यामुळे मला जे उत्तर देण्यांत आलेले आहे ते असमाधानकारक आहे आणि ही फक्त प्रशासकीय परिपूर्तता करण्याच्या दृष्टीने तयार केलेले उत्तर आहे. आणि अजूनही कावरापेठ असेल, भगवानगर असेल याठिकाणी मोठया प्रमाणात दूषित पाण्याच्या तक्रारी आहे. नगरसेवकांच्या माध्यमातुन ही आपण हया तक्रारी ऐकुन

घेतात, मात्र त्याचे कम्प्लायेंस होत नाही. त्याची अंमलबजावणी होत नाही आणि त्याची परिपूर्तता करण्यासाठी आम्ही सर्व्हीस कनेक्शन बदलण्याची कार्यवाही करून राहिलो आहे असे आपण उत्तर दिलेले आहे, सिव्हर चेंबरमधुन पाईप लाईन बाहेर काढणे, ते कधीपर्यंत आपण बाहेर काढणार आहे कोण–कोणत्या एरीयामध्ये आपण पाईप लाईन बदललेले आहे. आणि यानंतर गडर लाईनची नियमित सफाई करणे आता गडर लाईन साफ करणे हे काम आरोग्य विभागाच्या वतीने करण्यांत येतो त्यामुळे विभागाकडुन मला देण्यांत आलेले उत्तर समाधानकारक नाही. गडरचे चेंबर ब्लॉक होवुन राहिले म्हणुन पाणी घुसते हे बरोबर नाही. अवैद्य कनेक्शन बंद करणे, हया पध्दतीची उपाययोजना आपण कोणत्या कालखंड आपण निश्चित केलेला आहे काय ? ती कधीपर्यंत पुर्ण करणार आहे काय ?

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौरजी, मा.सदस्यांचे प्रश्न वेगवेगळे आहे. प्रलंबित तक्रारीवर करण्यांत आलेले कार्यवाही त्याचा पुर्ण तक्ता आपण जोडुन दिलेला आहे. दूषित पाण्याची तक्रार केव्हा प्राप्त झाली आहे. ती केव्हा सोडविण्यांत आली आहे.

श्री पुरुषोत्तम हजारे :– मा.महापौरजी, दूषित पाण्याच्या संदर्भात मा.सदस्यांच्या वारंवार तक्रारी येतात आणि त्या दूषित पाण्यामुळे त्या परिवारातील सदस्यांचे शरीर वीक होते. त्यांची प्रकृती खराब होते. अश्यावेळे त्या परिवारातील सदस्यांची प्रकृती खराब होत असेल त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती करायचे असेल तर ओ.सी.डब्लु. व महानगरपालिका त्यांना मुआवजा देते काय ? माझ्या परिसरात अश्या अनेक घटना घडलेल्या आहेत माझ्या प्रभाग दूषित पाणी येतो आणि त्यामुळे लोकांना डिसेंटरी, त्यांच्या शरीरात वीकपणा आलेला आहे तर मग यासाठी ओ.सी.डब्लु.नी काही उपाययोजना काढलेल्या आहेत काय ? मा.सदस्यांनी प्रश्न मांडले कि प्रशासन उत्तर देवुन देते. परंतु अश्या परिसरात ओ.सी.डब्लु.नी काही शिबीर घेतले आहे काय ? तेथे लोक बिमार होत आहे. त्यांची प्रकृतीची कोणी काळजी घेवून राहिले आहे काय ? कोणी काही करीत नाही.

श्री. हरीश ग्वालबंसी :– मा.महापौरजी, दूषित पानी की निगरानी करने का काम महानगरपालिका का है या फिर ओ.सी.डब्लु के कर्मचारीयो का है। वह लोग लापरवाही करते है, मा.सदस्योने उनसे तक्रार किये तब भी कोई कारवाई नही होती. इस बात पर कोई ध्यान नही देता।

श्री.दीपक वाडीभस्मे :– मा.महापौरजी, ब–याच दिवसापासून माझ्या परिसरात आयलिंग व गंदा पाणी येवून राहिले आहे, ओसीडब्लु चे अधिकारी पाहुन गेले, ते म्हणत आहे कि लाईन बदलविण्याचा त्रास होवून राहिला आहे. अधिका–यांनी याचे उत्तर द्यावे.

महापौर :– दूषित पाण्याची समस्या अत्यंत गंभीर आहे. मा.सदस्यांनी एक एक करून बोलावे.

श्री जुल्फेखार अहमद भुटटो :– मा.महापौरजी, नागपूर शहर का जो दिल है सेंटर नागपूर उस सेंटर नागपूर मे बरसोसे दूषित पानी आ रहा है, वहां कम से कम 70 से 80 प्रतिशत लोगो के यहां पर दूषित पानी आता है।

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, जर मिटर मोठया प्रमाणात घुमत असेल तर त्याची तक्रार केल्यानंतर मिटर चेक करण्याकरिता महानगरपालिकेकडे स्वतःची लॅब आहेत काय ? एस.एन.डी.एल. चे मिटर चेक करण्याकरिता लॅबमध्ये जातात, त्याचप्रमाणे महानगरपालिकेची लॅब आहे काय ?

श्री पुरुषोत्तम हजारे :– मा.महापौरजी, आयुक्तांनी आम्हाला विनंती केली आहे कि आपण कर भरल्यास, नळाचे बील भरल्यास आम्हाला सहायता करण्यांत येईल, आम्ही घरोघरी जावून लोकांना सांगुन राहिलो आहे कि तुमच्याकडे जर थकित पाणी व टॅक्सची वसुली असेल तर ती भरून घ्या. परंतु लोक जेव्हा आम्हाला समस्या सांगतात कि आमच्या घरी दूषित पाणी येते तेव्हा आम्ही काय करावे, त्यांना कसे उत्तर द्यावे.

श्री तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मा.प्रफुल्लजी गुडधे यांनी सभागृहामध्ये जो महत्वाचा मुद्या सभागृहामध्ये ठेवला आहे तो सर्व नगरसेवकांशी संबंधित आहे. दुषित पाण्याची तक्रारी आहे त्या अत्यंत मोठया प्रमाणात आहे. दुषित पाण्यामुळे शेकडो लोक मृत्युमुखी पडले अनेक लोकांना कावीळ झाला आणि त्या गरीब माणसाचा त्या ठिकाणी मृत्यु झाला आहे. पंडु पर्यत रोग झाले आहे. परंतु या ठिकाणी प्रशासनाकडुन ओ.सी.डब्लु कडुन कुठल्याही प्रकारची व्यवस्था होत नाही आणि दुषित पाण्यामुळे लोक बिमार होतात अनेक बिमा–या शहरामध्ये पसरलेल्या आहे आणि त्यावर कारण सांगतात की गडर लाईन

चोकेज झाल्यामुळे दुषित पाणी येते आमच्या प्रभागामध्ये आणि बाकी प्रभागामध्ये सुध्दा 3–3 वर्षापासुन लोकांची तक्रार आहे. मोमिनपुरा मध्ये मी दौरा केला बोरियापुरा परिसरामध्ये घाण पाणी पिण्यायोग्य पाणी नाही अशा परिस्थितीमध्ये कुठलीही व्यवस्था आपण केली नाही. रमजान सारखा चांगला पवित्र महिना होता त्यावेळी मी दौरा केला त्या ठिकाणी पाहिले परंतु अत्यंत घाण पाणी लोकांना पिण्यासाठी उपलब्ध होते. याची व्यवस्था आपण केलेली नाही. घाण पाण्याची तक्रारी किती दिवसामध्ये दुर होतील या संबधीची माहिती लिस्टवाईज दयावी आणि त्याची कॉपी नगरसेवकांना सादर करावी.

श्री जुल्फेखार अहमद भुट्टो :– मा.महापौरजी, मा.कमीश्नर साहब मै आपको एक बात बताना चाहता हुॅ की नागपूर शहर में कमीश्नर साहब का लेटर आया की जो पानी का बिल बाकी है टॅक्स बाकी है, उसको लोगोंसे वसुल करना हैं, उसके बाद गांधीबाग झोन मे मिटींग ली गयी वहां मैंने बताया आपने यहापर मराठी मे पुरी पब्लीसिटी किया, नागपूर शहर मे कमसे कम 50 परसेंट लोग हिंदी जानते है। अगर हिंदी मे पत्रक निकलेंगा, हिंदी मे बोर्ड बनेंगे तो हमको उसका जादा फायदा मिलेंगा। (बेल)

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी माझा स्पेसीफीक असा प्रश्न आहे की ज्या दुषित पाण्याच्या तक्रारी एका महिन्यापेक्षा अधिक प्रलंबित राहिल्या त्यामध्ये बिल माफ करणार आहे काय? त्या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

श्री. राजेश घोडपागे :– पॉइंट ऑफ इन्फार्मेशन मा.महापौरजी, मी दोन्ही प्रभागाचा दौरा केलेला आहे तेथे कॅपेक्सचे काम सुरु आहे आणि मोमिनपुरा चौकात जुनी पाईप लाईन असल्यामुळे दुषित पाणी येत आहे.

महापौर :– सर्व सन्माननिय सदस्यांचा विषय लक्षात आलेला आहे. (बेल)

श्री.मो.जमाल :– मा.महापौरजी, दुषित पानी सॅम्पल ओ.सी.डब्लु के अधिकारीयों को दिये ओ.सी.डब्लु. के तरफ से उसपर कोई भी हल नही निकाला गया। मै निवेदन करना चाहता हुॅ आपके माध्यम से जो ओ.सी.डब्लु को काम महानगरपालिकाने दिया है वह अच्छे तरीके से निभाए हमको प्रभाग मे अच्छा पाणी स्वस्थ पानी और साफसुथरा पानी सुंदर पानी ऐसा प्रोव्हाईड करे, इतने लोग बोल रहे उसकी वजह यह नही है की हमको बोलना है उसकी वहज यह है की हमारे पास बार बार सुबह उठने के बाद सोने तक लोग आते है। दुषित पानी की समस्या अधिकारीयों के पास नही जाती अधिकारीयों के पास समस्या हम लोग लेकर आते है। ओ.सी.डब्लु के अधिकारीयों को दुषित पानी की समस्या के लिये कई बार बुलाया धमकी तक दि की आपका ऑफीस बंद कर दुगा ये इतनी मोटी चमडी के क्यौ हो गयें है। इन्होने वादा किया था 24x7 पुरा करने का कई भागों मे 1 दिन आड पानी आ रहा है, दुषित पानी आ रहा है इस समस्या का निराकरण करना किसकी जबाबदारी बनती है, यें जबाबदारी हम लोगों की बनती है। तो ओ. सी.डब्लु. इस बात का जवाब दे वो इस समस्या का हल कब और कैसे करेंगा। चोकेज होना इस समस्या का हल नही है। मा.महापौरजी, मै गडर चोकेज के जगह पर जाता हुॅ अपने आखों से देखता हुॅ, चोकेज खुलवाता हुॅ पानी दुषित होने का कारन कम प्रेशर से पानी चल रहा है यह हैं। पानी पाईप मे स्टोअर रहना (बेल)

महापौर :– मा.सदस्यांनी दुषित पाण्याच्या पुरवठयाच्या संदर्भात जो विषय मांडला आहे तो अत्यंत गंभीर आहे. त्याची प्रशासनाने दखल घेवून एक महिन्याच्या आंत विशेष ड्राईव्ह घेवून या समस्येचे निराकरण करावे. पाणी वितरणासाठी टॅन्कर पुरविणे हे समस्याचे निराकरण नाही. प्रशासनाने दुषित पाण्याची समस्या दूर करण्यासंदर्भात जे करता येईल ते त्वरित करावे.

<u>प्रश्न क्र 21</u>:– डिम्स कंपनी (IDTM) मध्ये किती कर्मचारी व कोण कोणत्या पदावर व त्यांचा पगार किती संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्तः– वितरीत केल्याप्रमाणे

<u>प्रश्न क्र 22</u>:– घरकुल योजने अंतर्गत समाज कल्याण विभागाकडुन मार्च 2017 पर्यंत किती निधी आवंटीत करण्यात आला संदर्भात प्रश्न.

महापौर :– उत्तर तुम्हाला मिळाले आहे

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, उत्तर मिळाले आहे पण मी काय बोलत आहे ते समजायला पाहिजे माझ्या प्रश्नाचे उत्तर कसे दिले आहे त्या बद्दल सांगत आहे तर पहिला हप्ता 30.10.2002 रोजी 886 लक्ष रुपये दिला 2011 मध्ये 295.65 लक्ष दिले आणि असे एकुण 14 कोटी रुपये राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या माध्यमातुन महानगरपालिकेला प्राप्त झाले जे गरजु आहे त्यांनी त्या निधीचा वाटप करण्याचा प्रयत्न केला परंतु हा प्रयत्न करतांना ज्या पध्दतीने लोकांचे घरे बांधायला पाहिजे होते त्यामध्ये दिरंगाई केली. कारण की 2010—2011 मध्ये नागपूर महानगरपालिकेला निधी मिळाला ही निधी मिळाल्यानंतरही आज 2017 असतांना अनेक लाभार्थ्यांचे घर पुर्ण झाले नाही. अनेक लोकांना पहिला हप्ता दिला तो मिळाल्यानंतर त्यांनी महानगरपालिकेला आवश्यक जे कागदपत्र होते ते सबमिट केले दुसरा हप्ता घेतला आणि तिसरा घेतला परंतु आपणास सांगु इच्छितो की याच्यामध्ये नमुद केला आहे की 1.9 कोटी रुपये आमच्याकडे शिल्लक आहे. 2010 मध्ये आमच्याकडे निधी येते 2011 मध्ये निधी येते सातत्याने 6 ते 7 वर्ष लागुन जातात तरी त्या नागरिकांचे घर बनत नाही, ज्यांना पहिला हप्ता मिळाला त्यांना दुसरा हप्ता देतांना 6 ते 7 महिने वाट पहावी लागते, तिसरा हप्ता मिळायला वर्ष —वर्षभर वाट पहावी लागते आणि त्याच्यामुळे काय होते ज्या नागरिकांना पहिला हप्ता मिळाला ते घर बांधायला सुरुवात करतात किंवा त्या राहण्यासाठी तात्पुरती सोय म्हणुन आपल्या अंगणामध्ये छोटेसे टिनाचे शेड उभारतात तर कोणी किरायाने राहते आणि त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खराब असतांनाही कुणाला 2000 ते 3000 रुपये घरभाडे दयावे लागले तर कोणाला घराच्या समोर उघडयावर रहावे लागले अनेक लाभार्थ्यांना त्रास झाला योजनेचा फायदा मिळु शकला नाही. आणि याच्यामध्ये जे संपुर्ण दोषी आहे तर आमचा झोन आहे,ज्या प्रकारे त्यांनी माहिती दिली मी दुसरा प्रश्न टाकला होता नागपूर महानगरपालिकेच्या संपुर्ण क्षेत्रातील एकुण किती लाभार्थ्यांनी अर्ज केलेला आहे. उत्तर मिळाले 4737 संपुर्ण लोकांनी अर्ज केला होता आणि अर्ज केल्यानंतर नागपूर महानगरपालिकेने सर्व्हे केला आणि एक अत्यंत धोकादायक रिपोर्ट झोनवाईज आलेला आहे मी संबंधित अधिका—यांना किंवा आमचे सहा.आयुक्त आहे त्यांना आपल्या माध्यमातुन की झोनवाईज रमाई घरकुलचे किती आवेदन प्राप्त झाले त्याच्यावर आपण कुठली कुठली कारवाई केली त्याची माहिती सभागृहाला दयावी.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता स्लम (श्री.जांभुळकर) :— मा.महापौरजी, रमाई घरकुल योजना ही राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाची योजना आहे आणि नागपूर महानगरपालिका हया योजनेवर कार्य करीत आहे त्या मध्ये 2010 पासुन आतापर्यत पुर्वी 14 कोटी 16 लाख मिळाले आहे आणि त्यानंतर आता ही अमाउंट संपली आणि कमीटेड एक्सपेंडीचर आता खर्च झाला आहे त्यामध्ये 705 लाभार्थी पुर्ण शहरामध्ये मंजुर केले आहे आणि 14 कोटी रुपये संपले त्यामुळे आपण 25 कोटी रुपयांची डिमांड राज्य शासनाला केलेली आहे त्यानुसार आपल्याला 25 कोटी रुपये मिळाले आहे आता झोनवाईज घरकुल निर्माण समिती आहे त्या समितीमध्ये प्रस्ताव येतात झोनकडुन त्या समितीमध्ये मंजुरी करतो महिन्याला 1 किंवा 2 या विषयामध्ये 10 ही झोनची माहिती दिलेली आहे. लक्ष्मीनगर झोनमध्ये मंजुर केलेले प्राप्त झालेले एकुण लाभार्थी संभावित लाभार्थी सर्वेक्षणामध्ये आढळलेले लाभार्थी, पत्ता न सापडलेले लाभार्थी मंजुर लाभार्थी,

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, माझा प्रश्न सोपा होता की प्रत्येक झोनमध्ये किती एकुण लाभार्थी आहे. त्या लाभार्थ्याकरिता आपण काय काय केले? मी ते नाही विचारले की लाभार्थी किती आहे किती संख्या आढळली तो नंतरचा भाग आहे. परंतु पहिला प्रश्न माझा असा आहे की झोनवाईज किती लाभार्थी आहे.

महापौर :— मा.सदस्यगण, तुम्हाला लिखीत सुरुपात उत्तर दिलेले आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, ते उत्तर मला दिलेले आहे पण उत्तरामध्ये प्रत्येक प्रभागामध्ये रमाई घरकुल योजनेचे जे लाभार्थी आहे आणि संपुर्ण नगरसेवकांना माहित झाले पाहिजे रमाई घरकुल योजनेमध्ये काय झाले आहे, हा विषय माझा एकटयाचा नाही आहे हा नागपूर शहरातील जनतेचा प्रश्न आहे येथे नागपूर शहरातील जनतेने निवडुन दिलेले सर्व नगरसेवक असल्यामुळे त्यांना ही माहिती कळायला पाहिजे म्हणुन सभागृहामध्ये संपुर्ण माहिती दयावी त्याकरिता मी हा प्रश्न येथे टाकला आहे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, विषय असा आहे मा.सदस्यांनी चांगला विषय

या ठिकाणी ठेवला आहे ज्या गरिबांकरिता आपण त्या योजनेअंतर्गत जे घरे आपण करतो त्यामध्ये माझी अशी माहिती आहे की, झोन अंतर्गत आज जर अर्ज केला असेल तर पाच–पाच वर्षापर्यत त्याचा अर्ज निकाली निघत नाही. आणि त्याचा जर एक इन्स्टॉलमेंट पहिल्यांदा मंजुर झाला त्यानंतर त्याला बाकीचे इन्स्टॉलमेंट मिळण्यासाठी अतिशय विलंब लागतो म्हणुन त्याच्या घराची जी किंमत आहे आज जे मिळणार आहे ते वर्षभर जर पुर्ण झाले नाही तरी किंमत वाढते आणि या दिरंगाईच्या मागे आपल्या येथील कार्यरत जे प्रशासकीय लोक आहे जे संबंधित विभागात काम करतात त्याच्यावर जी जबाबदारी आहे. आणि म्हणुन त्यांनी ते ताबडतोब त्यांची घरे मुदतीच्या आत पुर्ण केले पाहिजे, या संबंधामध्ये माहिती त्यांनी दयावी.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी रमाई घरकुल योजनेअंतर्गत रमाई घरकुल योजना हा जो प्रश्न सभागृहात मांडला अत्यंत महानगरपालिकेमध्ये दुर्बल घटकात राहणारे लोक झोपडपट्टी ऐरियामध्ये राहणारे लोक किंवा ज्यांना घरे नाही आहे अशा लोकांनी महानगरपालिकेच्या माध्यमातुन जो अर्ज टाकले परंतु प्रश्न असा आहे की नविन प्रभाग रचनेनुसार अनेक क्षेत्र त्या विविध झोनमध्ये गेलेले आहे. आणि जी नविन प्रभाग रचना जी झालेली आहे, प्रभाग रचनेनुसार ती यादी दुस–या झोनमध्ये गेलेली आहे त्या संबंधित क्षेत्रातील लाभार्थी नगरसेवकांकडे येत असतात आणि म्हणतात की आम्ही घरकुल योजनेकरिता फार्म भरला आहे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी विषयाचे विषयांतर होत आहे.

महापौर :– इतर सदस्यांनी चर्चा करु नये ज्यांचा प्रश्न आहे त्यांना बोलु दयावे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, माझा पहिला प्रश्न हा आहे की झोनवाईज आतापर्यत किती लाभार्थी होते त्याचे जे आवेदन प्राप्त झाले त्यांची आज काय स्थिती आहे. ती संपुर्ण माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता स्लम (श्री.जांभुळकर) :– मा.महापौरजी, मी झोनवाईज माहिती देतो लक्ष्मीनगर झोन 342 लाभार्थी होते आणि सर्वेक्षणाअंती सापडलेले 249 धरमपेठ झोन ला 252 हनुमाननगर झोनला 277 नेहरुनगर झोनला 188 गांधीबाग झोनला 121, सतरंजीपुरा झोनला 331 लकडगंजला 382, आशीनगरला 507 आणि मंगळवारी झोनला 395 असे 3049 लाभार्थी सर्वेक्षणा अंती आढळले.

महापौर :– (बेल) ज्यांचा प्रश्न आहे तो अगोदर पुर्ण होवु दयावा.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, येथे झोनवाईज यादी त्यांनी सांगितली आणि सर्वेक्षणामध्ये आढळलेले लाभार्थी सांगितले आणि आता सर्वेक्षणाअंती पत्ता न सापडलेले लाभार्थी सांगा.

कार्यकारी अभियंता (श्री.जांभुळकर) :– मा.महापौरजी लक्ष्मीनगर झोनला 93

महापौर :– ही सर्व माहिती दिलेली आहे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी हा माझा एकटयाचा प्रश्न नाही संपुर्ण नागपूर शहराचा आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.जांभुळकर) :– मा.महापौरजी लक्ष्मीनगर झोनला 93, हनुमाननगरला 106, नेहरुनगरला 34, गांधीबागला 30, सतरंजीपुराला 196, लकडगंज 38, आशीनगरला 670, मंगळवारी झोनला 307 असे 1688 सर्वेक्षणाअंती सापडलेले नाही.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, अभिनंदन करावेसे वाटते सर्व सहा.आयुक्तांचे की 4700 लाभार्थ्यामधुन 3049 लाभार्थ्याचे घर मिळाले आणि 1088 लाभार्थ्यांचे घरच मिळुन नाही राहीले, आणि 1230 आशीनगर झोनमध्ये आहे आणि 670 लाभार्थी मिळाले नाही म्हणता मग आपण सर्व्हेक्षण केले की नाही, 670 हा फार मोठा आकडा झाला महानगरपालिकेने जो सर्व्हे केला तो चुकीचा केला त्यामुळे 1688 लोकांना जो लाभ मिळाला पाहिजे होता तो लाभापासुन वंचित राहिले आहे त्यामुळे महाराष्ट्र शासनानी गरीब लोकांकरिता ती योजना आणली होती त्या योजनेपासुन वंचित ठेवण्याचे काम नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाने केले असा हा आरोप मी या ठिकाणी लावतो, मा.महापौरजी, हा पुर्ण कार्यक्रम झोनच्या माध्यमातुन होतो, तेथे सहा.आयुक्त तितकेच जबाबदार आहे ज्या ज्या प्रभागाचे इंजिनिअर्स आहे तेही तितकेच जबाबदार आहे. मा.महापौरजी मी आपणास सांगु इच्छितो की अनेक लोक आहे ज्यांना पहिला हप्ता दिला आणि आता सांगितले की दुस–या हप्त्याकरिता 1 वर्ष आणि तिस–या हप्त्याकरिता 1 वर्ष 2010 मध्ये निधी वाटप झाला 2017 आला तरी लोकांचे घर झाले नाही. आजही लोक उघडयावर आपले वास्तव्य करतात ही शरमेची बाब आहे. मा.महापौरजी, शेवटचा प्रश्न मी घेतो महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण

विभागाच्या माध्यमातुन 25 कोटी रुपये प्राप्त झाले 2011 मध्ये ते 14 कोटी देतात आणि 25 कोटी रुपये दयायला त्यांना 10 वर्ष लागले, आता 6 वर्ष का लागले त्या बद्दल समाजकल्याण विभागाने यांना पत्र दिले होते त्या पत्राचे वाचन या सभागृहामध्ये करावे, समाजकल्याण विभागातर्फे पत्र आले होते की आम्ही तुम्हाला 25 कोटी रुपयांचा निधी दयायला तयार आहोत,

कार्यकारी अभियंता (श्री.जांभुळकर) :– मा.महापौरजी 25 कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, समाजकल्याण विभागाने स्पष्ट पत्र दिले होते, माझया हातामध्ये समाजकल्याण विभागाचे पत्र आहे आणि त्यांमध्ये म्हटले आहे की संबंधित अधिका–यांनी नागपूर महानगरपालिकेला पत्र दिले होते की आपण जी 14 कोटीची रक्कम रमाई घरकुल योजनेकरिता नागपूर महानगरपालिकेला दिली आहे त्या रकमेच्या उपयोग झाला की नाही झाला त्याचे उपयुक्त प्रमाणपत्र समाज कल्याण विभाग अनेक वर्षापासुन मागत होता आणि त्यामुळे तो 25 कोटी रुपये आतापर्यत मिळाले नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.जांभुळकर) :– मा.महापौरजी, मी आपणास सांगु इच्छितो की जे घर बांधायचे आहे ते लाभार्थ्यांना स्वतः बांधायचे आहे आणि त्याच्या स्टेजेस आहे. प्रथम स्टेज, सेकंड स्टेज आणि थर्ड स्टेज, प्रथम स्टेज ला काम मंजुर केल्यानंतर पहिला टप्पा देतो, सेकंड टप्पा जो पर्यत काम प्लिंथ लेव्हल पर्यत होत नाही लाभार्थ्याकडुन तो पर्यत दिला जात नाही आणि तिसरा टप्पा काम पुर्ण झाल्यानंतर देतो.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, ही माहिती बरोबर नाही.

कार्यकारी अभियंता श्री.जांभुळकर :– मा.महापौरजी, लाभार्थी स्वतः बांधकाम करतात.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, हा प्रश्न टाकायच्या मागचे कारण काय 2010 मध्ये ज्यांना घरे दिले त्यांनी आपले घरे बांधायला सुरुवात केली. 5–5 वर्षापासुन डॉक्युमेंट सादर केल्यानंतर पहिला हप्ता, दुसरा हप्ता आणि तिसरा हप्ता करीता आमच्या महानगरपालिकेने फाईल समोर पाठविली नाही. त्यामुळे घरे बांधायला वेळेवर निधी मिळाला पाहिजे होता तो 2–2 वर्ष निधी मिळाला नाही म्हणजे तो निधी खर्च झाला नाही, तो निधी खर्च झाला नााही. म्हणुन उपयुक्तता प्रमाणपत्र सादर करु शकले नाही त्यामुळे समाजकल्याण विभागाने 25 कोटी रुपये आजपर्यत थांबलेले होते या 25 कोटी रुपयामध्ये सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळणार नाही यामध्ये अनेक लाभार्थी राहणार आहे म्हणुन मा.महापौरजी सदनाला विनंती करतो आपल्या माध्यमातुन मा.आयुक्तांना विनंती करतो की जे सर्वेक्षणाअंती पत्ता न सापडल्यामुळे 1608 लाभार्थ्याची यादी आहे त्यांचा पुन्हा शोध घ्यावा ते निश्चित मिळतील तसेच वेळेवर लाभार्थ्यांना त्यांचे हप्ते मिळावे या करीता आपण योग्य दिशेने एखाद्या जबाबदार व्यक्तीवर याची जबाबदारी टाकावी ही विनंती करतो. रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून दयाल हीच विनंती करतो.

महापौर :– या प्रकरणांची आयुक्तांनी स्वःत तपासणी करून एक महिन्याच्या आंत सर्वेक्षणाचा अहवाल सादर करावा. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे पुढील विषय आपण पुढच्या सभेत घेवु कारण दिड तास झालेला आहे. विषयपत्रिकेला सुरुवात करीत आहे.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका कामकाज नियमावलीच्या अन्वये मी स्थगन प्रस्ताव दिला होता त्या स्थगन प्रस्तावाच्या संदर्भामध्ये आपण निर्णय घ्यावा अशी विनंती मी आपणाला करतो

श्री. तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी जो मुद्या उपस्थित केला आहे त्यावर सर्व सदस्यांची भावना तिव्र आहे त्या विषयाचा आपण स्वीकार करावा अशी आपणास विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, सतापक्षाच्या काही नगरसेवकांची देखील बैठक झाली आणि त्यामध्ये त्यांची देखील भावना या विषयावर सभागृहात चर्चा व्हावी, अशी आहे. या विषयावर हा अजेंडा झाल्यानंतर चर्चा घेण्यात यावी.

श्री. प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मी जो स्थगन प्रस्ताव दिलेला आहे तो नियमाच्या अनुषंगाने दिलेला आहे त्यामुळे मी जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचे वाचन करावे किंवा तो प्रस्ताव आपण स्वीकृत करत नसाल किंवा नामंजुर करीत आहे, तो आपला अधिकार आहे. परंतु माझा जो प्रदत्त अधिकार आहे त्या अधिकाराचा वापर करीत मी असा स्थगन प्रस्ताव अतिवृष्टीच्या संदर्भामध्ये याठिकाणी दिला आहे. मागच्या दोन दिवसाच्या पावसामुळे मोठया प्रमाणामध्ये खोलगट भागामध्ये लोकांच्या घरामध्ये पाणी घुसले आणि

अशा प्रसंगी कामकाज स्थगित करुन आपण हा स्थगन प्रस्ताव स्वीकारावा या बद्दल मी विनंती केलेली आहे तो अधिकार मा.महापौरजी पिठासीन अधिकारी म्हणुन आपला आहे. आपण आपल्या अधिकाराचा वापर करीत हा प्रस्ताव स्वीकार करता किंवा नाही या संदर्भात माहिती या सभागृहाला करुन दयावी मा. महापौरजी ऐवढीच मी आपणांस विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, आपण चर्चा करण्याचे ठरविलेलेच आहे आता होणार ती दोन तासानंतर होणार परंतु बाकी विषय थांबवायचे आणि या विषयावर आणि आत्ताच चर्चा केली पाहिजे असे करण्याची गरज नाही हा संपुर्ण अजेंडा झाल्यानंतर त्याच्यावर चर्चा करण्यात यावी.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, मला दिलेल्या प्रदत्त अधिकाराच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मी सादर केला असल्यामुळे आपण यावर निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र आहात आपल्याला तो अधिकार आहे, आपण आपल्या अधिकाराचा अवलंब करुन जर आपल्याला या विषयाची गरज वाटत नाही असे जर वाटत असेल तर निश्चितपणाने या नियमाअंतर्गत तो प्रस्ताव नाकरण्यासाठी सक्षम आहात (बेल) मा.महापौरजी, माझी विनंती आहे की या स्थगन प्रस्तावावर आपण निर्णय घ्यावा.

महापौर :– आपला प्रस्ताव नाकारत नाही आहे. सभागृहातील सर्व सदस्यांची या विषयावर तीव्र भावना आहे कारण आपण जो विषय मांडलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे. आपण जर आताच त्यावर चर्चा घेतली तर प्रश्नोत्तराच्या तासामधले काही प्रश्न राहुन जातील त्यामुळे मी आता विषयपत्रिका पुकारत आहे.

**<u>ठराव कमांक 62</u>**– मौजा बोरगांव येथील गिट्टीखदान चौकातील सुप्रिम प्लाझा या ईमारतीचे समोरील मनपाचे युरिनल तोडण्याचे प्रस्तावास दिनांक 06.04.2017 रोजी मा. आयुक्त यांनी मान्याता देवून त्यास सभागृहाची मान्यता आवश्यक असल्याने महासभेचे निर्णयार्थ सादर केलेले आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

(उपरोक्त ठरावास प्रभाग 14 अ च्या मा.नगरसेविका सौ. शिल्पा ईशांत धोटे यांनी विरोध दर्शविला)

**<u>ठराव कमांक 63</u>**:– ''दि आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ (सुधारीत २०१०) आजच्या तारखेस आकारण्यात येणाऱ्या जाहिरात शुल्कामधे २५ टक्के वाढ करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Rate | New Rate |
|---|---|---|---|---|---|
| 1 | a | Advertisements on hoarding or wall posts or in the form of illuminated & non illuminated sky - signs. | For a space up to 1 sq. mtr. | 17.5 | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less | 17.5 | 22.00 |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 17.5 | 22.00 |
| | c | Advertisements fixed or suspended in streets or on footpaths in connection with the charitable or educational object for a period not exceeding fifteen days. | Rates as shown in item 1 (a) | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | a | Advertisement fixed or suspended in streets or footpaths | For a space up to 1 Sq. mtr | 15.00 | 19.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 15.00 | 19.00 |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 26.5 | 33.00 |
| | c | Advertisement hoarding standing blank "but bearing the name of the advertiser or with the announcement to be let displayed there on. | 0.81 paisa per sq. mtr. Per month | 9.4 | Delit |
| 3 | a | Advertisement boards carried on vehicle | For a space up to 2 sq. mtr. | 35 | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 35 | 44.00 |
| | b | Loose poster which are posted or fixed on walls, roads or suspended in streets, etc. | 3.5 rupee per poster irrespective or the size but such posters must bear facsimile of an officer authorized by the corporation in this behalf. Posters without facsimile will be treated as unauthorized. But posters posted on hoardings or wall posters shall be charged at rate shown in item no. l(a) | | |
| 4 | | Illuminated advertisement boards carried on vehicle. | For a space up to 2 sq. mtr. | 62.5 | 78.50 |
| | | | For every additional 2 sq. mtr. or less | 62.5 | 78.50 |
| 5 | | Advertisement boards carried by sandwich board men etc. | For each board not exceeding 1 sq.mtr. | 17.5 | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr or less | 17.5 | 22.00 |
| 6 | | Illuminated advertisement boards, etc carried by sandwich board men. | For each board not exceeding 1 sq. mtr | 35 | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | 44.00 |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | 92.50 |

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Rate | New Rate |
|---|---|---|---|---|---|
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | 46.00 |
| 7 | a | For fixed illuminated sky-signs and advertisements. | For a space up to 0.2 sq.mtr. | 9 | 12.50 |
| | | | For every additional 0.2 sq. mtr. | 9 | 12.50 |
| | b | Advertisements on hoarding or wall posts illuminated by different means. | Rate shown in item 7 (a) above | | |
| 8 | | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon, slides or similar devices. | For a space to 0.5 sq.mtr | 70.00 | 88.00 |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | 88.00 |

<u>ठराव कमांक 64</u>:– महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 च्या कलम 18 अन्वये नागपूर महानगरपालिका सिमेअंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या वार्षिक भाडयाच्या 1 प्रतिशत वृक्ष उपकर (Tree Cess) लावण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न मा. सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजुर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव कमांक 65</u>:– दिनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी (SMID) या उपांगातंर्गत शहरी उपजिविका केंद्राव्दारे स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ निर्माण करण्याकरिता शहरी उपजिविका केंद्र खाली नमूद केलेल्या स्थळावर सुरू करण्याकरीता प्रस्तावीत करण्यात येत आहे. सदर कामाकरीता या घटकांतर्गत सन 2017–18 या आर्थिक वर्षात शासनाकडून रू. 7 लक्ष तरतुद प्राप्त झाली आहे. त्या तरतुदीमधून पायाभूत सुविधाचा खर्च भागविण्यात येईल.

| अ. क्र. | शहरी उपजिविका केंद्र | शहरी उपजिविका केंद्रातंर्गत देण्यात येणाऱ्या सुविधा |
|---|---|---|
| 1 | पंडीत रविशंकर शुक्ला<br><br>शाळा, टेम्पल बाजार रोड, सिताबर्डी, नागपूर | • स्वयंसहाय्य गटाने उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.<br>• महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकार यांच्या मार्फत सुरू असलेल्या योजनेची माहिती प्रदान करणे.<br>• शहरी गरीब त्यांच्या सेवा आणि वस्तू संघटित आणि विश्वसनीय पध्दतीने उपलब्ध करून देऊ शकतील. उपजीविका केंद्र हे शहरी गरीब उत्पादक व ग्राहक यांना जोडणारा दुवा असेल तसेच वस्तू व सेवा यांची मागणी व पुरवठा जोडण्याचे काम करेल.<br>• शहरी गरिबांना माहिती आणि व्यवसायासंबंधी आवष्यक सेवा मिळतील<br>• सदर विषयाशी संबंधीत सविस्तर माहिती नस्ती सोबत संलग्न करण्यात आली आहे. |

सबब दिनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र सुरू करण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर प्रस्ताव सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव कमांक 66</u>:– महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय GR-ESR-2010/307/प्र. क्र .40/2010/ ता. क 1, दिनांक 4/06/2010 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार नागपूर महानगरपालिकेस शहराचा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करणे अनिवार्य आहे. यानुसार वर्ष 2016 – 17 करीता नागपूर शहराचा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल, (ESR) राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (निरी) मार्फत तयार करण्यात आला असुन पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 67</u>**:— म.न.पा. ठराव क्र. 31, दि. 12/04/1976 नुसार अभियोक्ता हे पद पदोन्नतीने व व्यवहार व न्याय अभियोक्ता हे पद जाहिरातीने भरण्याची तरतूद आहे. अभियोक्ता हे पद मंजूर असून रिक्त आहे. व्यवहार व न्याय अभियोक्ता या पदाची 3 पदे मंजूर असून, 2 कर्मचारी कार्यरत आहेत, आरक्षणानुसार 1 (खुला) पद रिक्त आहे.

म.न.पा. ठराव क्र. 349, दि. 06/10/2016 नुसार नागपूर महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचा—यांमधून ज्यांच्याजवळ विधी विषयाची परीक्षा पास असलेल्या कर्मचा—यांमधून अभियोक्ता/व्यवहार न्याय अभियोक्ता या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हताधारण करण्या—या कर्मचा—यांमधून परिपत्रक काढून, आरक्षण व बिंदूनामावलीनुसार भरण्याची सभागृहाने मान्यता प्रदान केलेली आहे.

म.न.पा. ठराव क्र. 349, दि. 06/10/2016 च्या अनुषंगाने गठीत निवड समितीने दि. 30/05/2017 रोजी केलेल्या शिफारशीनुसार श्री. व्ही. डी. कपले, अन्न निरिक्षक, हे शैक्षणिक पात्राता व अनुभव पूर्ण करीत असल्यामुळे त्यांची ''अभियोक्ता (वेतनमान रू. 15600—39100—ग्रेड पे 5400)''(खुला संवर्ग) या पदाकरिता शिफारस करण्यात आलेली आहे.

तसेच श्री. एस. बी. फटींग, अन्न निरिक्षक, हे शैक्षणिक पात्रता व अनुभव पूर्ण करीत असल्यामुळे त्यांची ''व्यवहार व न्याय अभियोक्ता (वेतनमान रू. 9300—34800—ग्रेड पे 4300)''(खुला संवर्ग) या पदाकरिता शिफारस करण्यात आलेली आहे.

गठीत निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे, श्री. व्ही. डी. कपले यांना ''अभियोक्ता'' व श्री. एस. बी. फटींग यांना ''व्यवहार व न्याय अभियोक्ता'' या पदावर नियुक्ती देण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून प्रशासनाच्या प्रस्तावात नमुद श्री व्ही.डी.कपले यांना अभियोक्ता या पदावर नियुक्ती देण्यांत यावी. त्याचप्रमाणे व्यवहार व न्याय अभियोक्ता या पदाबाबत आजच्या तारखेला ज्या व्यक्तिची सेवाजेष्ठता जास्त आहे त्याची पडताळणी करून प्रशासनाने फेरप्रस्ताव सादर करावा. या मा.सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सूचनेस हा विषय मंजूर करण्यांत येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 68</u>**:— म.न.पा. ठराव क्र. 357, दिनांक 06.10.2016 अन्वये नागपूर महानगरपालिकेतपर्फे उर्जा निर्मीती संयंत्र बसविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्यात आलेल्या विषयामधे सद्यःस्थितीत केंद्र शासनाच्या या प्रकल्पासाठी मंजूर धोरणाचा विचार करता ज्या ज्या ठिकाणी महानगरपालिकेतपर्फे मिटर निहाय विजेचा वापर 1 कि.वॅट किंवा 1 कि.वॅट पेक्षा जास्त आहे त्या प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे सौर उर्जा निर्मीती संयंत्र बसविण्यास व पाणीपुरवठा केंद्रांमधे मोठया प्रमाणात होणा—या विजेच्या वापराचा विचार करता आवश्यक त्या ठिकाणी नेट मिटरींग व नेट मिटरींग शिवाय उर्जा निर्मीती संयंत्र बसविण्याचा प्रकल्प राबविण्यास व या प्रकल्पातील येणारा खर्च उर्जा निर्मीतीतून वळता करण्याच्या धर्तीवर राबविण्याच्या बदलासह असल्याचे अनुषंगाने मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव कमांक 69**</u>:–    नागपूर शहरातून निर्माण होणायावर प्रक्रिया करून विज निर्मित-या कच-ी प्रकल्प राबविण्याचा  प्रारूप करारनाम्यास मा .स्थायी समिती ठराव क्र .869 .दि ,26/12/2016 अन्वये मंजूरी प्राप्त आहे व त्यानंतर मनपा सभागृहाने ठराव क्र .389 .दि ,31/12/2016 अन्वये मंजूरी प्रदान केली आहे.

त्या  अनुषंगाने दि .04/01/2017 रोजी M/s Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Limited Mumbai (JV) यांना Letter of Acceptance )LOA) देण्यात आला.

तद्नंतर निविदेकाराने प्रकल्पाची व्यापती लक्षात घेता सुचविले बदल पुढील प्रमाणे आहेत.

1. प्रकल्प राबविण्याकरीता .एकर जागा देणे 10 एकर जागे ऐवजी 6

मामंजूर प्रारूप करारनामा व प्रकल्प  ,महासभेद्वारे .पा.न.स्थायी समिती द्वारा व म . व्यवस्थितरीत्या राबविण्याकरीता त्यात आवश्यक बदल करून केलेल्या करारनाम्याची प्रत नस्तीत उपलब्ध .आहे

मंजूर प्रारूप करारनाम्यात केलेल्या बदलासह दि .04/05/2017 रोजी साक्षांकित करण्यात आलेल्या करारनाम्याला  मंजूरी  प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

M/s Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Limited Mumbai (JV) यांना भांडेवाडी येथील एकर 6 01 एकर जागा नाममात्र रू 10 एकर म्हणजे एकूण 4 जागे व्यतिरिक्त/- प्रती चो फुट प्रतीवर्ष या दराने देण्याचा. प्रश्न सभागृहाने विचारात घेवून उपरोक्त जागा विकता तथा गहाण (मार्गेज) करता येणार नाही, या अटीवर देण्यात यावी या मा.सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यांत येतो या मा.महापौर यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव कमांक 70**</u>: –       नागपूर महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रात असलेल्या अनेक जिर्ण इमारती पाडण्याकरीता महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाकडून नोटीस देण्यात आलेले असून या जिर्ण इमारतीवर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई विभागाकडून झालेल्या अनियमीततेबाबत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस मा.महापौरजी यांनी सभागृहात पुकारला.

**<u>ठराव कमांक 71</u>: –** ''सन 2017–2018 या आर्थिक वर्षात जी.एस.टी. लागल्यामुळे वर्तमानपत्राच्या माध्यमातुन महानगरपालिकेची आर्थिक हालत विस्कळल्यामुळे हयाचा परिणाम होणाऱ्या विकास कामांमध्ये पडण्याची वस्तुस्थिती तसेच हया परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी, उपाययोजना शोधण्यासाठी चर्चा करण्यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस मा. महापौरजी यांनी सभागृहात पुकारला.

**<u>ठराव कमांक 72</u>: –** शहरातील विविध चौक रस्ते यांना नावे देण्याकरीता प्राप्त होणाऱ्या अर्जाची कार्यालयामार्फत छानबिन करून सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाची महानगरपालिकेला शिफारस करण्याकरीता नामकरण समिती यापूर्वी ठराव क्र. 21 दिनांक 20.11.2014 अन्वये गठीत करण्यात आली होती परंतू महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाल्यामूळे नव्याने हि समिती गठीत करण्याकरीता चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.सभागृहाने विचारात घेवून नामकरण समिती गठित करण्याचा अधिकार मा.महापौरजी यांना प्रदान करण्यांत येतो, या मा.सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सूचनेसह हा नोटीस मंजूर करण्यांत येतो, या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 73</u>: –** शहरातील मालमत्ताधारकांना सन 2017 मध्ये पाठविण्यात येत असलेल्या देयकामध्ये सन 2015 पासून नविन रेंट चार्ट नुसार कर आकारणी झाल्याचे ठराव क्र. 72 दिनांक 04. 03.2015 निदर्शनास येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदी नुसार अशा प्रकारची आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने करता येते किंवा नाही या बाबत चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची कर आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यांत येणार नाही, त्याचप्रमाणे यापूर्वी अश्याप्रकारची वसुली केली गेली असल्यास त्याचे समायोजन करण्यांत यावे अश्याप्रकारचे परिपत्रक काढुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे ठराव क्र. 72 दिनांक 4.03.2015 मधील अनुक्रमांक 4 व 11 वगळण्यात यावा. या मा.सत्तापक्ष नेते व मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या लेखी सूचनेसह हा नोटीस मंजूर करण्यांत येतो, या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 74</u>: –** नागपूर शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम होत असून, त्यावर संबंधीत विभाग महाराष्ट्र नगररचना अधिनियमातील कलम 53 कार्यवाही करित असतात. तसेच या विरुध्द कलम 47 महाराष्ट्र नगररचना अधिनियम कायदयामध्ये अपील महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना विभागाकडे दाखल करण्याचे प्रावधान आहे. काही ठिकाणी असे निदर्शनास आले आहे की, अपील मध्ये कोणताही स्थगनादेश नसतांना म.न.पा. तर्फे अनाधीकृत बांधकाम काढण्याची कार्यवाही, अपील दाखल असल्याचा कारणाने करीत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका कायदयाच्या कलम 260 अंतर्गत सुध्दा अनाधिकृत बांधकाम काढण्या संदंर्भात नोटीस देण्याचे प्रावधान आहे. या अगोदर सुध्दा म.न.पा.च्या आमसभेने व विधी

विशेष समितीने सुध्दा कलम 260 अंतर्गत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असताना नागपूर महानगरपालिका प्रशासन महाराष्ट्र नगररचना अधिनियम कायदया अंतर्गत कार्यवाही करित आहे, ती ताबडतोब थांबवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार कार्यवाही करण्याकरिता चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार विधी सल्लागारांचे अभिमत घेवून नागपूर महानगरपालिकेतर्फे अनधिकृत, मंजूरी विरूध्द बांधकामाविषयी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलमाअंतर्गत नोटीस देवून कार्यकाही करणे बंद करून त्या ऐवजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. या मा.सत्तापक्ष नेते व मा. सदस्य, श्री प्रविणजी दटके यांनी केलेल्या सूचनेसह हा नोटीस मंजूर करण्यांत येतो, या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 75 :</u>** — नागपूर शहरातील मालमत्तावरील कर आकारणी करताना दिनांक 01.04.2015 पासून नविन रेंटचार्ज प्रमाणे कर आकारणी करण्यात येत आहे. कायदयाविरूध्द कर आकारणी करण्यात येत असल्याने नागरिकांच्या मोठया प्रमाणात तक्रारी येत आहेत. त्यामूळे नव्याने कर आकारणी करतांना सुधारीत रेंटचार्ज प्रमाणे कर आकारणी दिनांक 01.04.2015 ऐवजी कायदयातील तरतूदीप्रमाणे कर आकारणी करण्याचा प्रश्न विचारात घेवून त्यावर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस मा.महापौरजी यांनी सभागृहात पुकारला.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**